# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

क्रमांक : संगाबाअवि/८/सी-२४४४/२०१८.
दिनांक : १९ / ०९ /२०१८.

## जाहिरात

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०९ (३) (a) अन्वये २०१९-२० सत्राकरीता नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय, वाढीव तुकडया सुरु करण्याबाबतचे अर्ज संस्थांनी / महाविद्यालयांनी विहीत नमुन्यात **दिनांक ३० सप्टेंबर, २०१८** पुर्वी विद्यापीठात सादर करायचे आहेत. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१७/(२९/१७)/मशि-४ दि. १५ सप्टेंबर,२०१७ नुसार शैक्षणिक सत्र २०१९-२० या वर्षापासून नवीन महाविद्यालये (व्यवसायिक व पारंपारिक) आणि क्र.एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३ सप्टेंबर, २०१७ नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम/ विषय व वाढीव तुकडयांना मंजुरी देण्यासाठी कार्यपध्दती विहीत केलेली आहे. प्राचार्य व संस्थाधारकांनी सदर शासन निर्णय काळजीपुर्वक वाचून शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करावी.

नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय,वाढीव तुकडयांचे अर्ज तसेच बृहत आराखडयाची प्रत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पतसंस्थेमध्ये दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ पासून विहीत शुल्काचा भरणा केल्यावर मिळेल.

बृहत आराखडयामध्ये दर्शविलेल्या ठिकाणासाठीच नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया इत्यादीबाबत अर्ज स्विकारल्या जातील, बृहत आराखडयामध्ये स्थान निश्चित केलेल्या ठिकाणा शिवाय इतर ठिकाणी नमूद केलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. संस्थाप्रमुख/प्राचार्यांनी बृहत आराखडयामध्ये नमूद ठिकाणी दर्शविलेल्या अभ्यासक्रम विषयासाठीचे अर्ज विहीत शुल्कासह सादर करावे. त्याव्यतिरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

संस्था चालकांनी नवीन महाविद्यालयाचे अर्ज Online पध्दतीने www.sgbau.ac.in यासंकेत स्थळावर भरावे तसेच संबंधीत अर्ज ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने म्हणजेच VCD आणि प्रचलीत पध्दतीने Hardcopy मध्ये ६ प्रतीत विद्यापीठाकडे सादर करावेत. संस्थेमध्ये असलेल्या सोयी-सुविधा व कर्मचारी / शिक्षक यांच्या विषयाचे Video चित्रिकरण करावे व सदर प्रस्ताव DVB-TTSurekh फॉन्टमध्येच शासनास सादर करावयाचे आहेत.

महाराष्ट्र शासन पत्र क्र. बृआमा २०१८/प्र.क्र.२८१/विशि-३, दिनांक १७/०९/२०१८ अन्वये शासनाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे बृहत आराखडा मंजुर केलेला असून, बृहत आराखड्यामध्ये नमुद बिंदुच्या ठिकाणाकरीता अर्ज स्विकारण्याबाबत आदेश दिलेले आहे. त्यानुसारच पात्र अर्जाचा विचार केला जाईल.

संस्थेने/महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारच्या तृट्या आढळून आल्यास संबंधित संस्थेने/ महाविद्यालयाने सादर केलेला अर्ज शासनाकडे शिफारस न करता संबंधितांना परत पाठविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**टिप**:- १) उपरोक्त जाहिरातीनुसार अर्जासोबत भरावयाची विहीत शुल्क Direction No.39/2004,Dt. 20.10.2004 व कार्यालयीन सुचना क्र. ३०, संगाबाअवि/८/२/एफ-५६६/२०१८, दिनांक ०६.०८.२०१८ नुसार **वित्त व लेखा आधिकारी,** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या नांवे धनाकर्ष काढुन विद्यापीठ खाती जमा करण्यात यावे.

२) ऑनलाईन अर्ज भरतांना अडचणी आल्यास मो.नं. ७२४९४१९०४० व दुरध्वनी क्र. ०७२१-२५६६२४५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**कुलसचिव**
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ.